# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे



छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका
(संपादित)

Role and Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Nation Building (Ed.)

संपादक :
प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे
सह संपादक :
प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. अभिजीत यादव, डॉ. संभाजी पाटील,
डॉ. राजशेखर सोलापुरे, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. सुदर्शन पाटील,
प्रा. माधव शेळके, प्रा. श्रीकृष्णा पांचाळ, डॉ. वितेश निकते,
प्रा. दिपीका स्वामी

ISBN 978-93-91689-21-6

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४ ८६९३५, ९४२१३ ७१७५७

© सर्व हक्क - प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्रथम आवृत्ती : १२ ऑक्टोबर २०२२

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मूल्य : ५००.०० रुपये

*'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका' या ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी महाविद्यालय प्रशासन, संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

३८. राजर्षी शाहू महाराजांचे कृषीधोरण व
जलनीती विषयक विचार
प्रा.डॉ.व्ही.पी. सांडूर ........................................ २४५
३९. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात
राबविलेल्या शिक्षण विषयक योजना
डॉ. शिवराज पाटील ........................................ २५३
४०. जनकल्याणकारी जाणता राजा : राजर्षी शाहू छत्रपती
डॉ. एस. पी. घायाळ ........................................ २६२
४१. राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरण व
सामाजिक न्यायाची भूमिका
लेफ्ट. डॉ. अर्चना टाक ........................................ २६९
४२. शैक्षणिक सुधारणा मधील छत्रपती राजर्षी
शाहू महाराजांची भूमिका
प्रा. राठोड अरविंद किशनराव ........................................ २७४
४३. राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन
प्रा. जोगदंड मकरंद बळीराम ........................................ २८०
४४. राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य
डॉ. जी. एच. पटेल, पांडुरंग विश्वनाथ कांबळे ........................ २८५
४५. शैक्षणिक सुधारणावरील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका
प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे ........................................ २९०
४६. भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे आद्यप्रवर्तक
राजर्षी शाहु महाराज - एक अभ्यास
डॉ. एन. व्ही. होदलूरकर ........................................ २९५
४७. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे कृषिविषयक धोरण
डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे ........................................ ३०४
४८. रयतेचा राजाः लोक राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज
प्रा. डॉ. रेणुका दशरथराव बडवणे (भवसार) ........................ ३०९
४९. आरक्षण धोरणाचे जनक : छत्रपती शाहू महाराज
डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील ........................................ ३१३

॥ ४५ ॥

# शैक्षणिक सुधारणावरील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका

प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे

**प्रस्तावना :**

शाहू महाराज २ एप्रिल १८९४ रोजी छत्रपती झाले. आणि कोल्हापुर संस्थानची राजसुत्रे त्यांच्या हाती आली. या प्रसंगी भरलेल्या दरबारात शाहू राजे म्हणतात, आमची प्रजा सदासर्वदा सुखी व संतुष्ट असावी. दिवसेंदिवस तिचे कल्याण वृध्दींगत व्हावे आणि आमच्या राज्याचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे.

राज्य चालविणारा शासक प्रजाहितदक्ष असेल तर तो राज्यशक्तीच्या आधारे समाजात क्रांतीकारक बदल घडवून आणु शकतो. प्रजेची सर्व प्रकारची उन्नती करुन आपल्या देशाला फार मोठे स्थान प्राप्त करुन देवू शकतो. याचे उदाहरण म्हणून आपणास आधुनिक भारताच्या इतिहासात कोल्हापुरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे नाव या संदर्भात घ्यावे लागते. अवघे २८ वर्षाच्या राजवटीत त्यांनी केलेले समाजसुधारणेचे कार्य अफाट व चकीत करणारे आहे.

शाहू महाराज राज्यकारभार पाहू लागल्या नंतर त्यांच्या असे लक्षात आले की, दरबारी आणि खाजी नोकरीत बहुतांष ब्राम्हणच आहेत. दरबाराच्या नोकरीत ७१ अधिकारी होते. त्यापैकी ६० ब्राम्हण, खाजगती ५२ अधिकाया पैकी ४५ ब्राम्हण समाजाचे होते. त्यामुळे कोल्हापूर दरबारात ब्राम्हणांचे वर्चस्व होते. लोकसंख्येच्या दृष्टीने ब्राम्हण ३ टक्के परंतु नोकरशाहीत ८० टक्के याचे कारण ब्राम्हण जातीत ७९.१ टक्के साक्षरता आहे. इतर जातीत साक्षरता हि मराठे ८.६ टक्के, कुणबी १.५ टक्के, मुसलमान ७.५ टक्के, जैन व लिंगायत १०.६ टक्के साक्षर असल्याचे त्यावेळच्या शिरगतीवरुन दिसून येते. शाहू महाराज म्हणतात, ज्यांचे साक्षरता प्रमाण अधिक तेच नोकायात असणार.

राज्याची सत्ता सुत्रे हाती घेतल्यानंतर शाहू महाराज आपल्या राज्यातील समस्यांचे मूळ शोधू लागले, या शोधातून त्यांच्या असे लक्षात आले की, या सर्व



समस्यांचे मूळ आहे अज्ञान, अविद्या. हे अज्ञान घालविण्यासाठी प्रजेला शिक्षणाची दारे उघडी करण्याचा निर्णय या गरीबाच्या कैवायान, विद्येच्या पुजायाने राजसुत्रे हाती घेताच दोन वर्षातच घेतला.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील शिक्षणाचा आढावा घेतल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, राज्यात १८७० साली राजाराम कॉलेज सुरु झाले होते. अमेरिकन मिशनची एक शाळा होती. ०२ अध्यापक विद्यालये होती, १० ॲंग्लो व्हर्नाक्युलर शाळा होत्या, १४२ प्राथमिक शाळा, ४ प्राथमिक रात्र शाळा दरबारातर्फे सुरु होत्या. काही प्राथमिक शाळाही होत्या. २६ मुलींच्या प्राथमिक शाळा होत्या, ०१ तांत्रिक शाळा ही होती. जवळपास १५००० विद्यार्थी पाटावर होते. परंतु त्यांच्या लक्षात आले की, या १५००० विद्यार्थ्यांपैकी १४००० ब्राम्हण जातीचेच विद्यार्थी आहेत. या शैक्षणिक परिस्थितीवर बोलतांना शाहू महाराज म्हणतात केवळ एकच जात विद्येचा उपभोग घेत होती. इतर जातीच्या घरात त्यांना ज्ञानाचा प्रकाश करायचा होता. शिक्षणाची गंगा गोरगरीबांपर्यंत पोहचावयाची होती.

शाहू महाराजांची आपल्या राज्यात सर्व जातीच्या मुला मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था केली. कोल्हापुरात त्यांनी अनेक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे सुरु केली. या सर्व वसतिगृहाचा त्यांना अभिमान होता. ते म्हणत, इंग्लडला जसे मदर ऑफ पार्लमेंट म्हणतात, तसे कोल्हापुर हे मदर ऑफ बोर्डिंग स्कुल आहे.

शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा सर्वांसाठी केलेल्या शैक्षणिक सुधारणा

**१. सर्व विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह :**

शाहू महाराजांनी सुरुवातीस राजाराम कॉलेजला जोडून एक वसतीगृह उघडले. त्यात ब्राम्हणासह इतर सर्व जातीच्या मुलांना प्रवेश दिला. या निमित्ताने ब्राम्हण ब्राम्हणेत्तरात मिसळतील व इतर जातीच्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण होईल. असे शाहू महाराजांना वाटले. परंतु ब्राम्हण मुल अब्राम्हण मुलांच्या पंगतीत बसत नव्हते, त्यांचा स्पर्श टाळत, त्यांचा विटाळ मानत त्यामुळे ब्राम्हणेत्तर पालकांनी आपली मुले त्या वसतीगृहातून काढली. हा महाराजांचा पहिला प्रयत्न फसला.

**२. राजवाड्यात मराठा मुलांना आश्रय :**

जातीयतेमुळे महाराजांनी काही मराठा मुलं शिक्षणासाठी आपल्या राजवाड्यात ठेवली. त्यांच्या जेवणाची, निवासाची, शाळेत नेण्या आणण्याची

सुविधा केली. तरीही हि मुल शिकली नाहीत. दुसरा प्रयत्न ही माराजांचा फसला.

**३. मराठा वसतीगृहाची स्थापणा :**

पहिले दोन्ही प्रयत्न फसले तरी शाहू महाराज हार मानणारे नव्हते. त्यांनी नव्या उमेदीने शिक्षणासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. १८ एप्रिल १९०१ ला महाराजांनी मराठा वसतीगृहाचे सर मॉरिसन यांच्या हस्ते उद्घाटन केले. वस्तीगृहात फक्त मराठ्यांचीच मुले घेतली अस नाही. त्यात इतर जातीचे ही विद्यार्थी होते. मुस्लीमांच्या १० विद्यार्थ्यांना मुद्दाम प्रवेश दिला होता. या वसतीगृहात १०० विद्यार्थ्यांची व्यवस्था केली होती. मराठा समाजाची मुले शिकून मोठी व्हावीत, नोकरी करावी, डॉक्टर, प्रोफेसर इंजिनिअर व्हावीत हा त्यामागील छत्रपती शाहू राजांचा उद्देश होता.

**४. वसतीगृहाची मालिका :**

छत्रपती शाहू राजांनी परिवर्तनाचे प्रभावी हत्यार म्हणून शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व दिले. हे शिक्षण समाजातील सर्व जाती धर्माच्या व गरीब मुलांना घेता यावे. म्हणून कोल्हापूरच्या परिसरात वसतीगृहाची मालिकाच तयार केली. विविध जातीच्या पुढाायांना वसतीगृह काढण्यास प्रोत्साहन दिले, आर्थिक मदत केली, इमारती दिल्या, प्रशस्त जागा दिल्या एकूनच शाहू महाराजांची कोल्हापूर नगरी ही वसतीगृहाची जननी झाली.

**५. प्रेरणादायी कार्य :**

कर्मविर भाउराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था व डॉ.पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापण करुन महाराष्ट्रभर पुढे शिक्षण संस्थांचे जाळे विनले. त्यांचे प्रेरणास्थान शाहू महाराजच होते. विदर्भातील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा मूळ उगम खामगाव येथे छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली १९१७ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठा परिषदेतच आहे.

**६. ब्राम्हण विद्यार्थ्यांसाठी ही शिक्षण :**

शाहू महाराजांनी बहुजन समाजालाच नव्हे तर ब्राम्हण समाजातील युवकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम या शतकाच्या सुरुवातीस शाहू महाराजांनी केले हे निर्विवाद सत्य इतिहासाला कधीच झाकता येणार नाही.

**७. दुर्बल घकांना फी माफी :**

छत्रपती शाहू राजांनी शिक्षणाचा मुलभूत विचार महाराष्ट्राला व देशाला दिला. समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणााया पालकांच्या मुलांना फि



माफ केल्याशिवाय शिक्षण प्रसार होवू शकणार नाही. त्यासाठी त्यांनी २० मे १९११ ला अर्थिक दृष्ट्या दुर्बल असणााया विद्यार्थ्यांना फि माफ करण्याचे धोरण स्विकारले.

**८. शिक्षणा संदर्भात अनेक राजाज्ञा (हुकुम) :**

प्रत्येक शाळेतील १५ टक्के मुलांना फि माफी देण्याची राजाज्ञा केली. त्यातही शेतकरी, कारागीर, मजुर यासारख्या शिक्षणापासून वंचित असलेल्या मागासलेल्या समाजाला प्राध्यान्य देण्यात यावे असा आदेश काढले.

**९. शाळेसाठी वेगवेगळ्या योजना :**

प्रत्येक शाळेचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून शाळा पंच पध्दती सुरु केली. शाळेतील शिक्षकांना योग्य मोबदला मिळावा म्हणून वेतन योजना सुरु केली. पगारी शिक्षकांच्या नेमणुका शाळेवर केल्या. शिक्षकांना योग्य प्रशिक्षण मिळावे यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु केले. अध्यापण कौशल्य वाढीस लागावे म्हणून परिक्षण, निरिक्षण यासारख्या विविध चाचण्या घेण्याची पध्दत सूरु केली.

**१०. दिल्ली दरबार मेमोरियल शाळा :**

राजश्री शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील प्रत्येक गावातील पाटलांना जमिन महसूल, मुलकी महसूल या संबंधी माहिती व्हावी म्हणून दिल्ली दरबार मेमोरियल पाटील शाळा १९१२ साली सुरु केली व राज्यातील सर्व गावातील पाटलांच्या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. तसे आदेश जारी केले.

**११. सत्यशोधक शाळा :**

छत्रपती शाहू राजांनी आपल्या राज्यात सत्यशोधाक शाळा काढून धार्मिक विधिंचे शिक्षण सर्वांसाठी सुरु केले. शालेय शिक्षण, कायदे शिक्षण व धार्मिक शिक्षण ह्या तीन ही शिक्षण क्षेत्राचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनी केले.

**१२. अनौपचारीक शिक्षण ही आवश्यक :**

राजर्षी शाहू महाराजांनी औपचारीक शिक्षणा सोबतच अनौपचारीक शिक्षणाला ही चालना दिली. त्यांना जीवन शिक्षण ही अभिप्रेत होते.

**१३. मुलींच्या शिक्षणास प्राधन्य :**

शाहू महाराजांनी मुलांच्या शिक्षणा सोबतच मुलींच्या शिक्षणास प्राधान्य दिले. ६ ऑक्टोंबर १९१९ च्या आदेशात ते म्हणतात, तमाम लोकास जाहिर करण्यात येते की, ज्यांच्यात पडदा पाळण्याची रित नाही आणि ज्यांच्यातील मुलींना व स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्या सर्व विद्यार्थीनींची राहण्याची, जेवणाची, शालेय फी व पुस्तकांची सर्व सुविधा सरकारी खर्चाने केली जाईल.

## १४. अस्पृष्य मुलीसाठी व्यवस्था :

चांभार, महार, मांग, ढोर यासारख्या अस्पृश्य समाजातील मुलींना शिक्षण देण्यासाठी शाहू महाराजांनी एक सेविका नेमली होती. या अस्पृश्य मुलींना ही शिष्यवृत्ती देण्याची राजाज्ञा काढली. १९२२ साली करविर राज्यात ३३ मुलींच्या शाळा सुरु होत्या. या शाळामध्ये २००० पेक्षा जास्त मुली शिक्षण घेत होत्या.

## १५. समाज जागृतीचे प्रभावी साधन :

उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शाळेच्या शिक्षणाकडे शाहू महाराजांचे अधिक लक्ष होते. इ.स.१९१९ मध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा कायदा केला. त्यांची हि कृती शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविणारी ठरली. बहुजन समाजात बौध्दीक जागृती करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन शाहू राजांनी समाजाच्या हाती दिले.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात सुरु केलेल्या शैक्षणिक संस्थामुळे व वसतीगृहामुळे ज्ञानाची गंगा सर्वसामान्य माणसाच्या झोपडी पर्यंत पोहचली शाहू महाराजांनी सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी २४ पेक्षा जास्त वसतीगृह शासनाच्या खर्चाने सुरु केल्याची नोंद सापडते. शिवाय अनेक वस्तीगृहांना व शाळांना त्यांनी सर्वोतोपरी मदत केली.

शिक्षणामुळे माणसाचा विकास होतो. त्याच्यात विचार शक्ती जागृत होते. त्याच्या अंगातील सुप्त शक्तीचा विकास होतो. त्याच्यात जागृती होते. हि एक प्रकारची शांत क्रांतीच असते. अशी शैक्षणिक क्रांतीची सुरुवात करणाया, त्यासाठी मदत, जागृती करणाया व प्रसंगी राजकीय आज्ञा, नियम करणाया प्रजाहित दक्ष छत्रपती शाहू राजांना मानाचा मुजरा.

**संदर्भ ग्रंथ :**

१. लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज - प्रा.रघुनाथ कडेव.
२. समरसता - रमेश पतंगे.
३. छत्रपती शाहू द पिल्लर ऑफ सोशल डेमोक्रेझी - एडीटर पि.बी.साळुखे

**प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे**
समाजशास्त्र विभाग
संत भगवान बाबा कला महाविदयालय
सिंदखेडराजा, जि.बुलडाणा
मो.नं.९९२१८३२९९४

ooo